| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 16 Dec 2024 | Arun from Solapur is on top | Sakal |




# सोलापूरचा अरुण अव्वल

## पुरुषांच्या शर्यतीत महाराष्ट्रीय धावपटूंचे वर्चस्व

**सकाळ वृत्तसेवा**

**पुणे, ता. १५ :** सर्वत्र उत्साहाचे वातावरण, आल्हाददायक वातावरण, सर्वसामान्य धावपटू तंदुरुस्तीसाठी तर प्रमुख धावपटू श्रेष्ठत्वसाठी धावत होते. अशा भारावलेल्या वातावरणात सकाळने आयोजित केलेल्या पाचव्या बजाज अलियान्झ पुणे हाफ मॅरेथॉनमध्ये सोलापूरचा अरुण राठोड पुरुषांच्या २१ किलोमीटर शर्यतीत अव्वल ठरला. विशेष म्हणजे या शर्यतीत पाचपैकी चार क्रमांक मिळवून महाराष्ट्रीय धावपटूंनी आपले लांब पल्याच्या शर्यतीतील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले.

शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून सकाळी सव्वा पाच वाजता थंड वातावरणात शर्यतीला सुरुवात झाली. त्यावेळी अरुण राठोड, विवेक मोरे, प्रधान किरुळकर, मध्य रेल्वेत कार्यरत असलेला हर्षद म्हात्रे, हरीश शेरॉन, नीतेश कुमार, दीपक कुंभार हा आघाडीचा जथ्था जवळ-जवळ सहा किलोमीटरपर्यंत एकत्र धावत होता. त्यानंतर यंदा हाँगकाँग येथे झालेल्या आशियाई क्रॉस कंट्री स्पर्धेत ब्राँझपदक जिंकणाऱ्या सोलापूरच्या अरुण राठोडने आघाडी घेण्यास सुरुवात केली. त्याच्या पाठोपाठ विवेक, प्रधान व दीपक कुंभार धावत होते. शर्यतीच्या मध्यावर विवेकने आघाडी घेण्यास सुरुवात केली.

शेवटचे दोन किलोमीटर शिल्लक असताना अरुणने वेग वाढविला. त्यापाठोपाठ विवेकनेही वेग वाढविला व येथेच त्याचे डावपेच चुकले. ही कबुली त्याने शर्यत संपल्यानंतरही दिली.

**पुरुष २१**

### पाचव्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर झेप

या स्पर्धेत सहभागी होण्याची विवेक मोरेची चौथी वेळ होय. कोल्हापूर जिल्ह्यातील असलेला २३ वर्षीय विवेक वनविभागात कार्यरत असून सध्या जालना येथे प्रशिक्षण घेत आहे. आई अंगणवाडी सेविका असून गेल्यावर्षी जानेवारी महिन्यात त्याच्या वडीलांचे निधन झाले. यानंतरही केवळ खेळाच्या प्रेमापोटी तो धावण्याचा सराव करतो. राज्य स्पर्धेत दहा हजार मीटर व स्टीपलचेस शर्यतीत सुवर्णपदक जिंकणाऱ्या विवेकला गेल्या दोन वर्षापासून येथे पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागत आहे. मात्र, यावेळी विजेतेपद जिंकण्याच्या इराद्याने तो सहभागी झाला होता. मात्र, शेवटच्या टप्यात संयम न ठेवल्याने विजेतेपद हुकल्याची खंत त्याने बोलून दाखवली. मात्र, पुढच्या वर्षी मी पुन्हा येईन आणि विजेतपद घेऊन जाईल, असा विश्वासही त्याने बोलून दाखविला.

### कुंभारची घसरण

सेनादलात कार्यरत असलेला कोल्हापूर जिल्ह्यातीलच दीपक कुंभारला विजेतेपद मिळविण्याचा विश्वास होता. मात्र, शर्यती दरम्यान पायाला हलकी दुखापत झाल्याने त्याला यश मिळविता आले नाही. त्याला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. दोन वर्षापूर्वी त्याने दुसरा क्रमांक मिळविला होता. यंदा दिल्ली अर्ध मॅरेथॉनमध्ये भारतीय गटात सातवे स्थान मिळविणाऱ्या दक्षिण पूर्व रेल्वेच्या हरीश शेरॉनला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. हर्षद म्हात्रेला पाचवे स्थान मिळाले.



“ ही शर्यत माझी एकप्रकारे ड्रीम शर्यत आहे. प्रत्येक वेळी मी विजेतेपदाच्या ईर्षेने सहभागी होतो. यावेळीही झालो होतो. तयारी उत्तम होती. मात्र, शेवटच्या टप्यात संयम न ठेवता आघाडी घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा फटका बसला. मात्र, प्रथमच दुसरा क्रमांक मिळाल्याचा आनंद आहे

**-विवेक मोरे**

### * निकाल

- **अरुण राठोड** (सोलापूर - १ तास ०४ मिनिटे १७ सेकंद)
- **विवेक मोरे** (कोल्हापूर - १ तास ०४ मिनिटे २० सेकंद)
- **दीपक कुंभार** (कोल्हापूर - १ तास ०४ मिनिटे २८ सेकंद)